# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी –४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४(१९९४चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

विशेष मागासवर्ग कक्ष

एम. आय. डि. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली–४४२६०५ फोन. नं. ०७१३२–२१६५९६

जावक क्रमांक:गों.वि./वि.मा.क/ ५१/२०१५ दि. ०१/०६/२०१५

प्रति,

१) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख

२) विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य

**विषय :– विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालित महाविद्यालयातील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना द्यावयाचा प्रवेशासंबंधीच्या निवड याद्या तयार करण्याची कार्यपध्दतीबाबत.**

महोदय,

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शन तत्वाला अनुसरून विद्यापीठातील शैक्षणिक विभाग संलग्नित व संचालीत महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तयार करण्यासंबंधी खालील प्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

१) सर्व प्रथम प्रवेशासाठी अर्ज केलेल्या पात्रताधारक विद्यार्थ्यांची (मागासवर्गीय विद्यार्थ्यासह) गुणवत्तेनुसार/ गुणांकानुसार यादी तयार करावी, एकूण प्रवेश क्षमतेचा ५०% विद्यार्थी संख्या ही खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र ठरत असल्यामूळे प्रवेश क्षमतेच्या ५०% विद्यार्थ्यांच्या सर्वप्रथम निवड यादीत समावेश करण्यात यावा, मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा वरील खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीत समावेश असल्यास त्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावा. त्यांचा समावेश मागासवर्गीय प्रवर्गासाठी तयार केलेल्या यादीत करण्यात येवू नये.

२) वरील खुल्या प्रर्वर्गातील यादीत समाविष्ट असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्याचा नंतर त्या खालोखाल गुणवत्ता/ गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची खालील टक्केवारी नुसार प्रवर्गनिहाय यादी तयार करावी व त्या प्रमाणे प्रवेश द्यावा.

१) अनु.जाती – १३ टक्के
२) अनु.जमाती – ७ टक्के
३) विमुक्त जाती (अ) – ३ टक्के
४) भटक्या जमाती (ब) – २.५ टक्के
५) भटक्या जमाती (क) – ३.५ टक्के
६) भटक्या जमाती (ड) – २ टक्के
७) इतर मागासवर्गीय – १९ टक्के

३) शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक/निर्णयानुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व खेळाडू ह्या वर्गवारीत विद्यार्थ्यांना त्यांच्या विहीत टक्केवारी नुसार त्यांच्या संबधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागामधून आडवे (Horizontal) आरक्षण देण्यात यावे.

४) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या जागापैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत विशेष मागासवर्गीय (SBC) उमेदवारास गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही घ्यावी.

५) वरील प्रमाणे २% पर्यंत विशेष मागासवर्गीय उमेदवारास प्रवेश देवूनही परिच्छेद २ मध्ये दर्शविलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात त्यांना विहीत केलेल्या टक्केवारी नुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या मागासवर्गीयांना इतर प्रवर्गातून गुणवत्तेनूसार खालील गटांअंतर्गत आंतरबदल (Inter Changeability) तत्वानूसार भरण्यात याव्या.

गट १) I) SC
II) ST
गट २) I) VJ (A)
II) NT (B)
गट ३) I) NT (C)
II) NT (D)
III) OBC

६) एकुण प्रवेश क्षमतेचा ३०% जांगावर महिलांना प्रवेश देणे आवश्यक असल्याने खुल्या व सर्व राखीव प्रवर्गातून ३०% जागांवर महिलांना प्रवेश मिळेल याबाबल दक्षता घावी.

७) शैक्षणिक सत्र २०१५–१६ पासून वरील कार्यपध्दतीचा अवलंब करून प्रवेश पूर्ण करण्यात यावी.

आपला

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली